# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दुरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.
E-mail : dtedesk2@gmail.com Internet : http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक: २/एनजीसी/मान्यता/२०१५/ २३७
दिनांक : 20 FEB 2015

## अधिसूचना

पहा-: ~~या संचालनालयाची अधिसूचना क्रमांक २/एनजीसी/मान्यता/२०१५/२२४,~~
दि. १३ फेब्रुवारी, २०१५

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद नवी दिल्ली यांनी सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षाकरीता मान्यता प्रक्रीयेसाठी ऑन-लाईन पध्दतीने अर्ज करण्यास दि. २७ फेब्रुवारी, २०१५ पर्यंत दिलेल्या मुदतवाढीच्या अनुषंगाने या संचालनालाच्या **संदर्भीन अधिसुचनेद्वारे दि. २३ व २४ फेब्रुवारी २०१५ रोजीच्या सुनावण्या रद्द करुन खालील प्रमाणे सुधारीत सुनावण्यांचा दिनांक अधिसूचित करण्यात येत आहे.**

| अ.क्र. | विभाग | सुनावणीचा दिनांक व | ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | नाशिक व पुणे विभाग | दि. ०२.०३.२०१५ रोजी सकाळी १०.३० वाजता | तंत्र शिक्षण संचालनालय, समिती सभागृह, मुख्य कार्यालय, मुंबई |
| २ | मुंबई व औरंगाबाद विभाग | दि. ०३.०३.२०१५ रोजी सकाळी १०.३० वाजता | |
| ३ | नागपूर व अमरावती विभाग | दि. ०४.०३.२०१५ रोजी सकाळी १०.३० वाजता | |

येथे असेही अधिसूचित करण्यात येते की, राज्यातील विद्यमान पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर / पदविकोत्तर पदविका या स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थानी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेसे सादर केलेल्या अर्जाची माहिती भरण्यासाठी या संचालनालयाच्या http://www.dtemaharashtra.gov.in/courseapproval२०१५/ या लिंकवर माहिती भरण्यासाठी दि. २७.०२.२०१५ पर्यंत किंवा परिषद यापुढे निर्धारीत करीत त्या दिनांकापर्यत मुदवाढ देण्यात येत आहे. तरी संबधित संस्थानी परिषदेस केलेल्या अर्जाची माहिती भरून भरलेल्या माहितीची निश्चिती [Confirm] करुन उपरोक्त सुनावण्यांसाठी उपस्थित रहावे. **सदर सुनावण्यांसाठी येतांना संदर्भीन अधिसूचनेत नमूद केलेल्या कागदपत्रांसह संचालनालयाच्या संकेतस्थळावरील Annexure D मध्ये भरलेल्या सांख्यकीय माहितीच्या समर्थनार्थ आवश्यक त्या संबंधित कागदपत्रासह उपस्थित रहावे.**

शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर / पदविकोत्तर पदविका या स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या नवीन तांत्रिक संस्था / महाविद्यालये सुरू करणे, विद्यमान संस्थांचे नवीन जागेत हस्तांतरण, संस्था बंद करणे इ. बाबत ज्या संस्थानी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेस अर्ज / प्रस्ताव सादर केले असतील अशा संस्थांनी दि. २७.०२.२०१५ पर्यंत प्रस्तावाच्या प्रतीसह सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे संपर्क साधावा. याबाबत विभागीय कार्यालयाकडे शासनाने विहित नोंदणी शुल्क भरल्यानंतर पुढील औपचारीक कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

---

पृष्ठांकन/तंशिस/विकाना/शैवि/२०१४-१५/ 536
दिनांक:- 21 FEB 2015

प्रति,
संचालक/प्राचार्य
सर्व पदवी, पदव्युत्तर पदवी व पदविका तसेच तस्सम संस्था,
नागपूर विभाग, नागपूर

उपरोक्त पत्राप्रमाणे कार्यवाही करण्यांत यावी.

सहसंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,
नागपूर.